## स्थायी समिति
## दाखल विषय – दि. १७/४/२०१८

**विषय क्रमांक :– ७३ त्वर्य**

चंदननगर खराडी भाजी मार्केट येथील दैनंदिन पास फी वसुलीचा मक्ता सन २०१३-१४ साठी र.रु.२४,५०,०००/-, सन २०१४-१५ साठी र.रु.२७,२५,०००/-,व सन२०१५-१६ साठी र.रु.३१,३०,०००/- एवढया रकमेने तीन वर्षाकरिता देण्यात आला होता,सदरहू पास फी मक्ता दि.३१/१०/२०१६ रोजी संपुष्टात आला असल्यामुळे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत पुर्वीच्याच ठेकेदारास मुदतवाढ देणेत आली आहे,सन २०१७ ते २०२० या तीन वर्षासाठी पास फी करीता दि.२७/१२/२०१७ रोजी जाहीरात दिली होती पुरेशी स्पर्धा न झाल्याने दि.१६/१/२०१८ रोजी मुदतवाढ दिली असता तीन निविदा प्राप्त झाल्या असून अनुक्रमे १) मे. सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.,२) मे.मंगेश एंटरप्रायजेस, पुणे , ३) मे.नवनाथ जगन्नाथ गायकवाड त्यापैकी निविदेमधील अटी व शर्ती प्रमाणे दोन निविदा पात्र झाल्या आहेत. त्यांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे.

<u>तुलनात्मक तक्ता</u>

| अ.क्र. | निविदादाराचे नाव | सन | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.<br>वर्ल्ड ट्रेड सेंटर,टॉवर-२,८०८ इऑन,आयटी पार्क जवळ,खराडी,<br>पुणे -१४ | प्रथम वर्ष<br>द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष | ५०,५१,११५/-<br>५६,५७,२४८/-<br>६५,०५,८३६/- |
| २ | मंगेश एंटरप्रायजेस<br>स.नं.५०/१, दिनकर पठारे नगर,नियर शहा मार्केट,चंदननगर , पुणे -१४ | प्रथम वर्ष<br>द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष | ४५,०२,६००/-<br>५६,०१,०००/-<br>५८,००,०००/- |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केल्यानंतर मे.सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे यांनी मनपास देवू केलेली सन २०१७-१८ साठी वार्षिक रक्कम रुपये ५०,५१,११५/- , सन २०१८-१९ साठी वार्षिक रक्कम रुपये५६,५७,२४८/-, व सन २०१९-२०२० साठी रक्कम रुपये ६५,०५,८३६/- ही रक्कम मे.मंगेश एंटरप्रायजेस ,पुणे यांच्या रकमेपेक्षा जास्त आहे.तथापी ठेकेदाराने दिलेल्या वार्षीक रक्कमेनुसार सन २०१७-२०१८ हे आर्थिक वर्षे संपुष्टात आले आहे.तथापी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या शिध्रसिध्द गणक व सन २०१७-१८ या वर्षाचा शिध्रसिध्द गणकामधील दरामध्ये बदल झाला नसल्याने ठेकेदारास त्याने नमूद केलेल्या उपरोक्त दरानुसार ताबा दिंनाका पासुन पुढील तीन वर्षा साठी दिल्यास ठेकेदारास निविदे प्रमाणे संपूर्ण ३ वर्षाचा कालावधी मिळू शकतो.त्यामुळे सन २०१७-१८ ऐवजी प्रथम वर्षे,सन २०१८-१९ ऐवजी द्वितीय वर्ष व सन २०१९-२०२० ऐवजी तृतीय वर्षे असे ग्रृहीत धरता येईल. तसेच म.न.पा. ने निर्धारीत केलेली रक्कम रू. ३५,०५,६००/- पेक्षा निविदादाराने देऊ केलेली रक्कम कितीतरी अधिक असल्याने यात म.न.पा. चे नुकसान होत नसल्याने चंदननगर खराडी भाजी मंडईचा दैनंदिन पास फी वसूलीचा मक्ता उपरोक्त तक्यात नमूद केल्यानुसार कमाल रक्कम देवू करणारे मक्तेदार मे.सायन व्हिजिलेन्ट सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे,यांना ताबा दिंनाका पासून तीन वर्षासाठी देणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/एफएमओ/१४ दि.१३/४/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ७४ त्वर्य**

भामा आसखेड प्रकल्पाअंतर्गत करंजविहारे ग्रामपंचायत ता.खेड येथे ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे कॉंक्रीट रस्ता बनविणेसाठी खालील बाबीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८९ नुसार मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापू/१५ दि.१६/४/२०१८ चे पत्र.

१) भामा आसखेड प्रकल्पाअंतर्गत करंजविहारे ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायतीच्या मागणीप्रमाणे कॉंक्रीट रस्ते करणे या विकास कामासाठी र.रुपये ९.९२ लक्ष रक्कम धनादेश/डिमांडड्राफ्टद्वारे ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यास.

**विषय क्रमांक :– ७५ त्वर्य**

महापौर विकास निधीतून करावयाची कामे – पुणे शहरातील विविध रस्ते व चौकांमध्ये नाम फलक बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी द्वितीय क्रमांकाचे ठेकेदार मे.राजेश एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,१८,८७,५२२=९४ पेक्षा ४.६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,०८,६५,३७५=६२ अधिक निविदा शर्तीप्रमाणे सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम कमी/अधिक करणेस तसेच इतर निविदा शर्तीनुसार काम करुन घेऊन देयक अदा करणेस यांस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/२२ दि. १६/४/२०१८ चे पत्र.

(टिप :– ऑनलाईन निविदा मागविली असता, दोन निविदा धारकांचे अनुक्रमे मे.निखील एन्टरप्रायजेस व मे.राजेश एन्टरप्रायजेस यांचे निविदा दर एक समान ४.५% कमी दराने असल्याने, संबंधितांमार्फत पुनश्च सिलबंद पाकिटमध्ये निविदा दर मागवून उघडणेत आले असता, मे.निखील एन्टरप्रायजेस – ४.६७% कमी दराने व मे.राजेश एन्टरप्रायजेस – ४.५९% कमी दराने असे दर प्राप्त झाले आहेत. संबंधित कंत्राटदार यांनी सदर काम करणे शक्य नसल्याने, सदरहु काम करणेस असमर्थता दर्शविलेली आहे तसेच संबंधितांमार्फत कळविणेत आलेले कारण असमाधानकारक असून, संबंधित कंत्राटदार मे.निखील एन्टरप्रायजेस यांच्यावर सदर कामात सादर करणेत आलेली १% बयाणा रक्कम रुपये२,१८,८७५/– इतकी जप्त करणेची कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरहु कामातील अन्य लघुत्तम दराचे कंत्राटदार मे.राजेश एन्टरप्रायजेस, पुणे यांनी सदर काम मे.निखील एन्टरप्रायजेस यांचे ४.६७% इतक्या कमी निविदा दराने अथवा त्यापेक्षा कमी दराने काम करणेस बाबत विचारणा केली असता, संबंधित कंत्राटदार यांनी ४.६७% इतक्या कमी निविदा दराने काम करणेस होकार कळविलेला आहे.)

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**